Time : 1½ Hours **SOCIAL SCIENCE-II (M)**

**Subject Code**

| S | 1 | 0 | 1 | 2 | B |
|---|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 32** **(Printed Pages : 5)** **Maximum Marks : 40**

***सूचना :—***

(*i*) या प्रश्न पत्रिकेत एकूण 32 प्रश्न आहेत. **सर्व** प्रश्न अनिवार्य आहे.

(*ii*) प्रश्नांपुढे गुण दिलेले आहेत.

(*iii*) प्रश्न क्रमांक 30, 31 व 32 हे नकाशावर आधारित प्रश्न आहेत.

(*iv*) प्रश्न पत्रिकेच्या एकूणच प्रश्नांना पर्याय दिलेले नाहीत. प्रश्न 28 आणि 29 यांना पर्याय दिलेले आहेत.

(*v*) गरजेनुसार सूचना दिलेल्या आहेत.

* खालील विधानांना अचूक पर्याय निवडून पूर्ण वाक्य पुन्हा लिहा : 4

1. उत्तराखंडातील कार्यकर्त्यांच्या गटाने सुरू केलेली चळवळ ..................................

   * पश्चिम घाट वाचवा
   * बेडथी मोहीम
   * बिज बचाव आंदोलन
   * मिट्टी बचाव अभियान

2. रबर हे औद्योगिक पीक म्हणून मोठ्या प्रमाणावर .................. या राज्यात घेतले जाते.

   * केरळ
   * महाराष्ट्र
   * उत्तरप्रदेश
   * सिक्किम

3. एक व्यक्ती एक मत या तत्त्वावर चालणारी बँक ................................ आहे.

* मध्यवर्ती बँक
* सहकारी बँक
* व्यापारी बँक
* परदेशी बँक

4. गोव्यातील उंचावरच्या भागाचा उपयोग बागायती पिकांसाठी केला जातो, त्या भागाला .......... म्हणतात.

* केर
* खाजण
* पडीक जमीन
* भरड भूमी

* नावे द्या : 3

5. अन्नपीक तसेच जनावरांचा चारा म्हणून वापरले जाणारे धान्य.

6. गोव्यातील खारफुटीच्या सर्वाधिक प्रजाती मुबलक प्रमाणात सापडणारे बेट.

7. जमिनीवरील वाहतुकीचा नव्याने विकसित झालेला प्रकार.

* भौगोलिक संज्ञा द्या : 2

8. निर्जीव घटकांपासून संपादित केली जाणारी साधनसंपत्ती.

9. महाराष्ट्रातील पारंपारिक पद्धतीने पाणी साठविण्याची पद्धत.

*  खालील प्रत्येक प्रश्नांची उत्तरे लिहा : 7

10. गाळ्याच्या मृदेचे कोणतेही **एक** वैशिष्ट्य लिहा.

11. राज्य महामार्ग म्हणजे काय ?

12. शेतीमुळे जलप्रदूषण कसे होते ?

13. मुदत ठेव खात्यावर सर्वाधिक व्याज का मिळतो ?

14. व्यापार म्हणजे काय ?

15. कोणता ग्राहक हक्क धोकादायक उत्पादनांपासून सुरक्षित राहण्याच्या अधिकाराची हमी देतो ?

16. स्थानिक प्रादेशिक प्रजाती म्हणजे काय ?

*  खालीलपैकी प्रत्येक विधानांचे भौगोलिक कारण लिहा : 5

17. गोवा सरकारने पुर्ननिर्मितीक्षम आपारंपारीक ऊर्जा साधनसंपत्तीचा विकास करण्याचे ठरविले आहे.

18. डोंगर उतारावरची जमीन कॉफीच्या पिकाला उपयुक्त असते.

19. गोवा सरकारने हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या आहेत.

20. जंगलावर अवलंबून असलेल्या समूहांना जंगले महत्त्वाची आहेत.

21. बहुउद्देशिय योजनांना विरोध निर्माण झाला आहे.

*  खालील प्रश्नांची उत्तरे **दोन** मुद्द्यात करा : 16

22. भारतातील बेरोजगारीची कारणे कोणती ?

23. पारंपारिक ऊर्जा स्रोत व अ-पारंपारिक ऊर्जा स्रोत यामधील फरक लिहा.

24. नियोजन प्रक्रियेच्या विविध पायऱ्या कोणत्या ?

25. ध्वनी प्रदूषणामुळे औद्योगिक कामगारांवर कसा परिणाम होतो ?

26. ऊर्जा संसाधनाचे संरक्षण करण्यासाठी उपाय सुचवा.

27. मोटार गाड्यांचा उद्योग हा मुंबई, कोलकाता व चेन्नई यासारख्या बंदराच्या शहरात का एकवटलेला आहे ?

28. शेतीतील धान्य उत्पादन, विशेषत: अन्न धान्य पिकांचे उत्पादन कमी होण्याचे घटक कोणते ?

**किंवा**

व्यापारी शेतीची उद्दिष्ट्ये कोणती ?

29. जगभरातील पर्यटक भारतात आकर्षित होतात. स्पष्ट करा.

**किंवा**

भारतीय रेल्वेला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. स्पष्ट करा.

* खाली दिलेल्या भारताच्या बाह्यरेखा नकाशावर खालील गोष्टी चिन्हांकित करा, तसेच तुम्ही वापरलेल्या चिन्हांची अनुक्रमाणिका काढा : 3

30. कर्नाटकातील म्हैसूर तंत्रज्ञान पार्क

31. ओरिसातील पारादीप सागरी बंदर

32. उत्तर प्रदेशातील नारोरा अणु प्रकल्प.


68°
72°
76°
80°
84°
88°
92°
96°
36°
32°
28°
24°
20°
16°
12°
8°
INDIA
Political
Scale 1: 15.44M
N